**ठळक बातम्या**

- जागतिक पातळीवर प्रतिकूल परिस्थिती असताना भारत समर्थपणे आर्थिक अडचणींना तोंड देत असल्याचं रिझर्व बँकेच्या गव्हर्नरांचं प्रतिपादन

- रेपोदरात बदल नाही, आर्थिक वृद्धीदर घटण्याचा अंदाज

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरात दौऱ्यावर/ महाराष्ट्र आणि गुजरातला जोडणाऱ्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा करणार लोकार्पण आणि पायाभरणी

- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत भारताचे हरिहरन अंशकरुणन आणि एम आर अर्जुन या जोडीचा उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

जागतिक पातळीवर प्रतिकूल परिस्थिती असताना भारत समर्थपणे आर्थिक अडचणींना तोंड देत असल्याचं रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं. रिझर्व बँकेचा द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केल्यानंतर ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. ऐकूया सविस्तर वृत्त आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - -कॅप्सूल - - - -**

*(रिझर्व्ह बँकेनं व्याजदर जैसे थे ठेवण्याचा निर्णय पतधोरण आढावा समितीच्या द्वैमासिक बैठकीनंतर आज जाहीर केला. त्यामुळं रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम राहणार आहे. त्याचवेळी आर्थिक वृद्धी दराचा अंदाज ६ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवरुन घटवून ६ पूर्णांक ६ दशांश टक्के केला आहे. जागतिक पुरवठा साखळीत निर्माण झालेले अडथळे, कमी मान्सून यामुळं वृद्धी दर कमी होण्याची शक्यता गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज वर्तवली. ग्राहक किंमत निर्देशाकांवर आधारित चलनफुगवट्याचा दर चालू आर्थिक वर्षात ५ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलंय. यापूर्वी हा दर ४ पूर्णांक ६ दशांश टक्के*

*असेल, असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज होता. इंधनाच्या वाढलेल्या किंमती, इतर वस्तूंच्या दरात झालेली वाढ यामुळं चलनवाढीचा दर वाढलेला असेल, असं मल्होत्रा म्हणाले.*

*पश्चिम आशियातल्या संघर्षाचा फटका केवळ भारतालाच नव्हे, जगातल्या इतर अनेक देशांना बसला आहे. त्या मानाने भारताची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभारली असल्याने या संकटाला समर्थपणे तोंड देत आहे असं ते म्हणाले. सध्या इंधनाचे वाढते दर ही चिंतेची बाब आहे, मात्र लौकरच परिस्थिती निवळेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली…*

***- - - होल्ड - बाईट- मल्होत्रा - - -***

*देशात चलनी नोटांकरता प्लॅस्टिकचा वापर करण्याचा विचार अगदी प्राथमिक पातळीवर असल्याचं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. बाजारात चलनी नोटांच्या उपलब्धतेवर रिझर्व बँकेचं लक्ष असून आवश्यक असेल तेव्हा नोटा उपलब्ध करुन दिल्या जातील असं त्यांनी स्पष्ट केलं.*

*अधिकाधिक परकीय भांडवल भारतात आकर्षित करण्यासाठी काही उपायांची घोषणा रिझर्व्ह बँकेनं आज केली. त्यानुसार सरकारी कर्ज रोखे आता अधिक कालावधीसाठी जारी केले जाणार आहेत. याशिवाय परदेशात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या नागरिकांना भारतीय शेअर बाजारात अधिक प्रमाणात गुंतवणूक करण्याची मुभा रिझर्व्ह बँकेनं दिली आहे.)*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरात दौऱ्यावर आहेत. सुरत इथं महाराष्ट्र आणि गुजरातला अधिक वेगवान आणि सक्षम वाहतूक जाळ्याने जोडणाऱ्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी त्यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमात वडोदरा-मुंबई एक्सप्रेसवेच्या सहाव्या आणि सातव्या पॅकेजचं राष्ट्रार्पण करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे गुजरात आणि महाराष्ट्रादरम्यान अतिजलद वाहतूक, लॉजिस्टिक कार्यक्षमता आणि आर्थिक दळणवळणाला मोठी चालना मिळेल. या दौऱ्यामध्ये प्रधानमंत्री मोदी सुरतमध्ये रस्ते, ऊर्जा आणि औद्योगिक क्षेत्रांशी संबंधित १८ हजार ८०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या, विविध विकासकामांचं उद्घाटन आणि लोकार्पण करतील. संध्याकाळी ते दमणला भेट देणार आहेत. तिथे आरोग्यसेवा आणि विमान वाहतूक क्षेत्रातील महत्त्वाच्या सुविधांसह सुमारे २ हजार ९७० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी ते करणार आहेत. तसंच 'नमो' विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं आणि आधुनिक

रुग्णालयाचे मोदी उद्घाटन करणार आहेत. 'आयकॉनिक ब्रिज', दमण कन्व्हेन्शन सेंटर आणि 'निफ्ट' कॅम्पस यांसारख्या अनेक महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची पायाभरणीही प्रधानमंत्री मोदी करतील. तसंच लक्षद्वीपसाठी ८८५ कोटी रुपये किमतीच्या बंदर प्रकल्पांचीही पायाभरणी ते करणार आहेत.

<><><><><>

नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथे येत्या २३ तारखेला होणाऱ्या दुसऱ्या, नागरी सन्मान सोहळ्यात ६५ मान्यवरांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पद्म पुरस्कार प्रदान करतील. गेल्या महिन्यात झालेल्या पहिल्या नागरी सन्मान सोहळ्यात ६६ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले होते. यंदा, ५ पद्म विभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांसह एकूण १३१ पद्म पुरस्कार प्रदान करायला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली होती. हे पुरस्कार दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने जाहीर केले जातात. कला, समाजकार्य, सार्वजनिक व्यवहार, विज्ञान आणि अभियांत्रिकी, व्यापार आणि उद्योग, वैद्यकशास्त्र, साहित्य आणि शिक्षण, क्रीडा आणि नागरी सेवा यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना हे पुरस्कार दिले जातात.

<><><><><>

सीबीएसईच्या निकालानंतरच्या तक्रार निवारण प्रक्रियेच्या माध्यमातून इयत्ता बारावीच्या ७० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. यात गुण पडताळणीसाठी ७ हजार ३१४ अर्ज तर पुनर्मूल्यांकनासाठी ६३ हजारांपेक्षा जास्त अर्जांचा समावेश आहे. १३ मे रोजी इयत्ता बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी मिळालेल्या गुणांबाबत असमाधानी असल्याची प्रतिक्रिया दिली होती, तसंच ऑन स्क्रीन मार्किंग प्रणालीअंतर्गत मूल्यांकनाच्या अचूकतेविषयीही प्रश्न उपस्थित केला होता. उत्तरपत्रिकांच्या स्कॅन केलेल्या प्रतींमध्ये आढळलेल्या त्रुटींच्या पडताळणीसाठी आणि उत्तरांच्या पुनर्मूल्यांकनासाठी सीबीएसईने ऑनलाइन पोर्टल सुरू केलं होतं.

<><><><><>

आज जागतिक पर्यावरण दिन... निसर्गाचं महत्व समजून घेणं आणि वाढत्या प्रदूषणाबद्दल जागरूकता निर्माण करणं या उद्देशाने दरवर्षी ५ जूनला जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येतो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस  पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाला चालना देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, असं मोदी यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे.

गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह , कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान, लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी पर्यावरण दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

आजच्या  पर्यावरण दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

मुंबईमध्ये भारतीय जनता युवा मोर्चाकडून  बोरिवलीतल्या  संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ‘पेडल फॉर प्लॅनेट ग्रँड सायक्लोथॉन’ या  कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘एक पेड माँ के नाम’ या संकल्पनेअंतर्गत यावेळी वृक्षारोपण करण्यात आलं.

<><><><><>

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरी गटात भारताच्या हरिहरन अंशकरुणन आणि एम आर अर्जुन या जोडीने उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक क्रमवारीत त्यांच्यापेक्षा वरचढ असलेली मलेशियन जोडी आरोन ताई  आणि कांग खाई झिंग, यांना काल त्यांनी चकित केलं. हरिहरन आणि अर्जुन ने १६- २१, २१-१५, २१-१९ असा विजय मिळवला. या स्पर्धेत बाकी भारतीय खेळाडूंचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

<><><><><>

इराणबरोबर वाटाघाटी सुरू असल्या तरीही कोणत्याही परिस्थितीत तेहरानला अण्वस्त्र निर्मितीपासून कायमस्वरुपी रोखण्याचं आपलं उद्दिष्ट असल्याचा पुनरुच्चार अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. भविष्यात कोणत्याही करारानुसार इराणला अण्वस्त्र मिळवण्याची परवानगी कधीही दिली जाणार नाही, असंही ते म्हणाले.

<><><><><>

ओमानने मस्कतजवळच्या आपल्या एका महत्त्वाच्या तेलनिर्यात केंद्रावर झालेल्या हल्ल्यानंतर कच्च्या तेलाची निर्यात थांबवली आहे. मीना अल फहल या निर्यातीसाठीच्या मुख्य केंद्राजवळ हा स्फोट झाला होता.

//<><><><><>//